



# दैनिक अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

अचूक वेध, अचूक बातमी

newsaksharaj2021@gmail.com

संपादक : विनोद कैलास गोरे






● वर्ष ३ रे ● अंक २६० वा ● पाने ४ | बुलडाणा, मंगळवार, दि.३० एप्रिल २०२४ | ● RNI NO. : MAHMAR/2022/82056 ● किंमत : ३ रुपये




'मोगरा महोत्सवा निमित्त' श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात सुंदर व आकर्षक मोगऱ्याच्या सजावटीत बाप्पांचे मनमोहक रूप.

।। गणाधीशा भालचंद्रा गजवक्रा गणराया, वक्रतुंडा धुम्रवर्णा गणपती बाप्पा मोरया ।।




# करोना संकटानंतर नवीनच धोका ! जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा

**दि.२९, पुणे :** करोना संकटाच्या काळात डॉक्टरांकडून प्रतिजैविकांचा अतिवापर करण्यात आला. अनेक रुग्णांना आवश्यक नसतानाही प्रतिजैविके देण्यात आली. जगभरात सरासरी चारपैकी तीन रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. यामुळे आता प्रतिजैविक प्रतिरोधाची समस्या जगभरात जाणवू लागली आहे, असा निष्कर्ष जागतिक आरोग्य संघटनेने काढला आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने ६५ देशांतील रुग्णालयांमध्ये दाखल झालेल्या ४ लाख ५० हजार करोना रुग्णांच्या आरोग्य अहवालाची तपासणी केली. हे रुग्ण जानेवारी २०२० ते मार्च २०२३ या कालावधीतील आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे की, करोना संकटाच्या काळात रुग्णालयात दाखल झालेल्या केवळ ८ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्याची गरज होती. प्रत्यक्षात डॉक्टरांकडून जगभरात सरासरी ७५ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. पश्चिम प्रशांत विभागात ३३ टक्के रुग्णांना तर आखाती आणि आफ्रिकी देशांमध्ये ८३ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. युरोप आणि अमेरिकेत २०२० ते




२०२२ या कालावधीत प्रतिजैविके देण्यात प्रमाण हळूहळू कमी झाले. मात्र, आफ्रिकेत ते वाढताना दिसून आले. प्रतिजैविकांचा सर्वाधिक वापर करोनामुळे गंभीर स्थिती झालेल्या रुग्णांमध्ये झाला. जगभरात अशा ८१ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. मध्यम अथवा सौम्य त्रास असलेल्या करोना रुग्णांना प्रतिजैविके देण्याचे प्रमाण विभागनिहाय वेगळे असून, त्यात आफ्रिकेत सर्वाधिक ७९ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. विशेष म्हणजे, प्रतिजैविके देण्यात आल्याने करोना रुग्णांच्या प्रकृतीत फरक पडला नाही. याउलट जीवाणूसंसर्ग नसलेल्या रुग्णांच्या आरोग्याला त्यामुळे अपाय झाला, असे संघटनेने नमूद केले आहे.

एखाद्या रुग्णाला प्रतिजैविके देण्याची गरज असते त्यावेळी जोखमीपेक्षा फायदा अधिक असल्याचे तपासले जाते. मात्र, गरज नसताना रुग्णाला प्रतिजैविक दिल्यास कोणताही फायदा होत नाही. उलट रुग्णामध्ये प्रतिजैविक प्रतिरोध निर्माण होतो.
**-डॉ. सिल्व्हिया बर्टानोलियो, प्रतिजैविक प्रतिरोध विभाग, जागतिक आरोग्य संघटना**

**जागतिक आरोग्य संघटना काय म्हणते ?**
- * करोना संकटाच्या काळात गरज नसताना रुग्णांना प्रतिजैविके
- * जगभरात चारपैकी तीन रुग्णांना प्रतिजैविके
- * प्रतिजैविके देऊनही करोना रुग्णांना फायदा नाही
- * जीवाणूसंसर्ग नसलेल्या रुग्णांना प्रतिजैविकांमुळे अपाय
- * अनेक रुग्णांमध्ये प्रतिजैविक प्रतिरोधाची समस्या निर्माण

# महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांसाठी काय केले ?
## गुजरातच्या कांदा निर्यात धोरणावर शरद पवारांचा निशाणा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, शेवगाव (अ.नगर) :** केंद्र सरकारने गुजरातमधील शेतकऱ्याने पिकविलेल्या कांद्याची निर्यात करण्यास परवानगी दिली. गुजरातचे शेतकरी आमचे शत्रू नाहीत. त्यांचा कांदा निर्यात झाला तर आम्हाला आनंद आहे. मात्र गुजरातच्या कांद्याला परवानगी मिळत असताना महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी काय घोडं मारलं ? असा प्रश्न उपस्थित करीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला.

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ शेवगांव येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत पवार हे बोलत होते. माजी मंत्री बाळासाहेब थोरात, प्राजक्त तनपुरे, प्रताप ढाकणे, सुभाष लांडे, राजेंद्र फाळके, प्रभावती घोगरे, शिवशंकर राजळे, नितिन काकडे, बंडू रासणे आदी यावेळी उपस्थित होते.

पवार म्हणाले, कांदा जिरायत शेतकऱ्याचे महत्वाचे पिक. केंद्र सरकारने निर्णय घेतला कांदा देशाबाहेर पाठवायचा नाही, परराज्यात पाठवायचा नाही. शेतकऱ्याच्या हाती दोन पैसे मिळत असताना कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली. साखर, उसाच्या उत्पादनात महाराष्ट्र राज्य अव्वल आहे. या उद्योगातून विविध उपपदार्थांची निर्मिती केली जाते. या उद्योगाचे धोरणही बदलण्याचा प्रयत्न केला जात असल्याने केंद्रातील सरकार शेतकऱ्यांना न्याय देणारे नसल्याचा घणाघात पवार यांनी केला.

**लंके यांच्यासारखे कोरोनातील काम केंद्राला का जमले नाही ?**

नीलेश लंके हे पारनेरसारख्या दुष्काळी भागातील व्यक्तीमत्व. कोरोना



संकटात त्यांनी ३३ हजार कोरोना रूग्णांना उपचार मिळवून दिले. घरी न जाता कोरोनाग्रस्त रूग्णांमध्ये झोपून त्यांना दिलासा दिला. लॉकडाउनमध्ये घरी जाणाऱ्या नगरीकांसाठी सुविधा दिली. जे काम निलेश लंके करू शकतात ते काम केंद्र सरकार का करू शकले नाही असा सवाल त्यांनी यावेळी केला.

**विरोधकांना सत्तेचा, पैशांचा दर्प झाला - बाळासाहेब थोरात**

जनतेचा उमेदवार कसा असावा याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे निलेश लंके होय. या गड्याने या मतदारसंघात काय जादू केली माहिती नाही. रात्री दोन वाजेपर्यंत त्यांची लोक वाट पाहत असतात. पारनेरमध्ये गेल्यानंतर त्यांचे कामाचे कौतुक ऐकण्यास मिळते. विरोधी उमेदवाराला सत्तेचा पैशांचा दर्प झाला असून त्यांचे गर्वहरण करण्यासाठी निलेश लंके यांना विजयी करून देशात इतिहास घडवायचा आहे. हा लोकशाहीचा विजय ठरणार आहे. विरोधी उमेदवार मोठी पार्टी आहे. त्यांना मदत केली काय, नाही केली काय सर्वांना त्रास देणे त्यांचा पिंड असल्याची टीका बाळासाहेब थोरात यांनी केली.

# थोडक्यात

## महापालिकेच्या जुन्या वास्तूंचा होणार कायापालट

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२९ ठाणे :** महापालिकेची रुग्णालये, शाळा, मार्केट आणि प्रशासकीय कार्यालये आदी जुन्या वास्तूंचा नागरिकांच्या सोयीसाठी व सुरक्षेच्या दृष्टीने कायापालट करण्याची मोहीम सुरू करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नुकतेच दिले आहेत.कोपरी आणि नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील कामाचा आढावा महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी वागळे प्रभाग समिती कार्यालयात घेतला. त्यावेळी नौपाडा प्रभाग समिती कार्यालयाची नवीन इमारत आणि कोपरी उप समिती प्रभाग कार्यालयाच्या इमारतीची दुरुस्ती या दोन्ही गोष्टी प्राध्यान्याने हाती घेण्यात याव्यात. त्याचा प्रस्ताव जलद गतीने सादर करुन आचारसंहिता पुर्ण झाल्यावर त्यांच्या मंजूरीची, निधीसाठीची प्रक्रिया पुर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. नागरीकांना चांगले प्रशासकीय कार्यालय मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.तसेच महापालिकेच्या ज्या वास्तू जुन्या झाल्या आहेत त्यांचा चेहरामोहरा बदलणे आवश्यक आहे. यामध्ये इमारत दुरुस्ती, अंर्तगत आणि बाह्य रंगरंगोटी, प्रवेश आणि निकास मार्गिका, पार्किंग आदींचा समावेश आहे.नागरिकांना महापालिकेच्या वास्तूमध्ये यावेसे वाटले पाहिजे,असेही आयुक्त या प्रसंगी बोलले. आपत्ती व्यवस्थापनाबाबतचा सविस्तर आराखडा महिन्याभरात बांधकाम विभागाने तयार करावा,तसेच कोपरी आणि नौपाडा क्षेत्रातील सी वन या अतिधोकादायक वर्गवारीतील २६ इमारती अजूनही व्याप्त आहेत. त्यात १७८ कुटुंबे आणि ६७ दुकाने आहेत यांचे निष्कासन करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात यावा, त्याची गांभीर्याने अंमलबजावणी करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

## दुचाकी अपघातात पुत्र ठार, वडील गंभीर जखमी


**दि.२९, बुलढाणा :** मलकापूरनजीकच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील अपघातात पुत्र जागीच ठार तर वडील गंभीर जखमी झाले. आज धरणगावनजीक ही दुर्दैवी घटना घडली. तालासवाडा येथील सुपडा श्रीहरी घाईट (५४) व त्यांचा मुलगा अजय सुपडा घाईट (२२) हे दोघेजण एम एच २८ बीपी ८७५४ या दुचाकीने तालासवाड्यावरून मलकापूरकडे येत होते.

दरम्यान खोदकाम केलेल्या रस्त्यामुळे त्यांची दुचाकी स्लिप होऊन थेट रस्तादुभाजकाला धडकली. यात अजय घाईट हा जागीच ठार झाला तर त्याचे वडील सुपडा घाईट गंभीररित्या जखमी झाले. नागरिकांनी खाजगी वाहनाद्वारे जखमी सुपडा घाईट यांना उपचारार्थ मलकापूरच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. मागील वर्षीच या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्यात आले होते. या रस्त्याचे लोकार्पणही जवळपास चार महिने आधीच संपन्न झाले. अशा परिस्थितीत देखभाल दुरुस्तींतर्गत जिथे रस्ता निकृष्ट दर्जाचा बनला आहे तो भाग काढून टाकण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून सद्यस्थितीत सुरू आहे. असेच काम धरणगावजवळ करण्यात आले होते.

# पुन्हा उष्णतेच्या झळा; 'थंड हवेची ठिकाणे'ही उकाड्याने हैराण

**दि.२९, अमरावती :** हवामान विभागाच्या अंदाजानुसार कोकण किनारपट्टीसह राज्याच्या बहुतांश भागांत रविवारी उष्णतेची लाट परतली. अनेक भागांत कमाल तापमानाचा पारा ३५ ते ४० अंशांच्या वर गेल्यामुळे काहिली वाढली आहे. उन्हाळय़ाच्या सुट्टीत अनेकांची आवडती थंड हवेची ठिकाणे, महाबळेश्वर आणि माथेरानमध्येही उकाडा वाढल्यामुळे शनिवारी-रविवारी तेथे गेलेल्यांची निराशा झाली. दुसरीकडे अमरावती विभागात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले असून महिनाभरात टँकरग्रस्त गावांची संख्या दुप्पट झाली आहे.

काही दिवसांपूर्वी विदर्भाच्या अनेक भागांत अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. मात्र त्यानंतर आता उकाडय़ाने जीवाची काहिली सुरू झाली असून पाणीटंचाईच्या झळा अधिकाधिक जाणवू लागल्या आहेत. गर्तेत सापडलेल्या पश्चिम विदर्भातील गावांची संख्याही तितक्याच झपाटय़ाने वाढत आहे. साधारणत: महिनाभरात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवणाऱ्या गावांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली असून त्यामुळे त्याच प्रमाणात टँकरची संख्याही विस्तारली आहे. सद्यस्थितीत विभागातील टँकरचा आकडा ५५ पर्यंत पोहचला आहे. अमरावती विभागात २८ मार्च रोजी २६ गावांना २६ टँकरने पाणीपुरवठा होत होता. परंतु, ऊन तापू लागल्यानंतर रविवापर्यंत टँकरग्रस्त गावांची संख्या ५१ झाली आहे. सर्वाधिक ४७ टँकर बुलढाणा जिल्ह्यात असून अमरावती जिल्ह्यातील ४ गावांमध्ये ७ टँकरने पाणीपुरवठा होत आहे. यवतमाळ जिल्ह्यात



एका गावात टँकर सुरू झाला आहे. अद्याप संपूर्ण मे महिना बाकी असल्याने दुष्काळाच्या कचाटय़ात सापडणाऱ्या गावांची आणि पर्यायाने टँकरची संख्या आणखी वाढण्याची चिन्हे आहेत. ग्रामीण भागांत नदी, नाले, ओहोळ कोरडेठाक पडले असून लहान बंधारे, धरणेही कोरडी झाली आहेत. अशा स्थितीत गावांना केवळ विहिरींचा आधार होता. आता तोही संपुष्टात येऊ लागला आहे. नागरिकांसह जनावरांच्याही पाण्याचा प्रश्नही गंभीर आहे. माथेरान मुंबईपेक्षा गरम

थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरामचे कमाल तापमान रविवारी मुंबईपेक्षाही जास्त नोंदविले गेले. मुंबईपासून जवळ असलेल्या रायगड जिल्ह्यातील या 'हिल स्टेशन'वर तब्बल ३९ अंश कमाल तापमानाची नोंद झाली. मात्र संध्याकाळनंतर तापमानात घट होण्यास सुरवात झाली. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वरमध्येही ३४.१ अंश तापमानाची नोंद झाली. त्यामुळे शहराच्या उकाडय़ापासून बचावासाठी तेथे गेलेल्या पर्यटकांचा प्रचंड विरस झाला.

सोलापुरात सर्वाधिक तापमान

राज्यातील सर्वाधिक सरासरी कमाल तापमानाची नोंद रविवारी ४३.७ अंश सेल्सिअस सोलापूर येथे झाली. जळगाव (४२.२), मोहोळ (४२.५), नांदेड (४२.४), सांगली (४१), सातारा (४०.५) येथेही तापमान अधिक होते. कोकण, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ येथे कमाल व किमान तापमानात वाढ झाली. काही भागात कमाल तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअस राहील असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# संपादकीय



## मान्सूनचा सुखद सांगावा

मागील काही वर्षात दुष्काळाने पिचलेल्या महाराष्ट्राला भारतीय हवामान खात्याने सुखद धक्का दिला आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी पडणाऱ्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी सुखावणारा आहे. कारण यावर्षी सरासरीच्या १०० ते १०३ टक्के इतका पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. यावर्षी देशाच्या उत्तर आणि ईशान्य भागात तसेच महाराष्ट्रासह दक्षिण भागातही सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी जितका सुखावणारा आहे तितकाच तो उद्योग जगतासाठीही सुखावणारा आहे.

कारण कोरोनामुळे उद्योग जगताची घसरलेली गाडी अजूनही सावरलेली नाही. त्यात मागील दोन वर्ष राज्यावर दुष्काळाचे सावट होते. या वर्षीही राज्यात भयंकर दुष्काळ असल्याने त्याचा उद्योग जगतावर देखील मोठा परिणाम झाला आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे. शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशाची ६० टक्के लोकसंख्या ही शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे तिच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी शेतीचे विशेष महत्व आहे. मागील काही वर्षात देशात दुष्काळ पडला होता. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. कोरोनामुळे देशातील अनेक उद्योग ठप्प पडले होते.

त्यामुळे देशाचा जिडीपी ही घसरला होता अशावेळी शेती क्षेत्राने देशाला वाचवले होते. कोरोना गेल्यानंतर सर्व काही सुरळीत होईल अशी अपेक्षा असतानाच या वर्षी राज्यात आणि देशात पुन्हा भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या वर्षी राज्यात अत्यल्प पाऊस पडल्याने राज्यात भीषण दुष्काळ पडला आहे. दुष्काळामुळे राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. राज्यातील पाणी साठा संपत आला आहे. नद्या कोरड्या पडल्या आहेत. धरणे आटली आहे. बोअरवेलला पाणी लागत नाही. नागरिकांना वापरण्यासाठी सोडा पण पिण्यासाठी देखील पाणी मिळत नाही. एका एका हांड्यासासाठी नागरिकांना कैक किलोमिटरची पायपीट करावी लागत आहे. शहरात आठ आठ दिवसांनी टँकर येत आहे. राज्यात दुष्काळ पडल्याने शेतीलाही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. अशावेळी सर्वांच्या नजरा हवामान खात्याच्या अंदाजाकडे लागल्या होत्या. सुदैवाने हवामान खात्याचा सुखद अंदाज आल्याने राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांना सुखद धक्का बसला आहे.

यावर्षी सरासरी इतका पाऊस होणार असल्याने भरघोस पीक येऊन रान आबादानी होणार आहे. शिवाय राज्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटणार आहे. जर हवामान खात्याने वर्तवलेला अंदाजानुसार पाऊस झाला तर उद्योग जगतावर ही त्याचा सकारात्मक परिणाम होईल. एकूणच हवामान खात्याने वर्तवलेला मान्सूनचा हा सुखद अंदाज सर्वांनाच सुखावणारा आहे.

# माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र !



कणखर देशा, दगडांचा देशा, पवित्र देशा.... असे ज्या महाराष्ट्राचे वर्णन केले जाते त्या महाराष्ट्रात माझा जन्म झाला, त्या महाराष्ट्रात मी लहानाचा मोठा झालो, वाढलो याचा मला सार्थ अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने आणि साधू संतांच्या वाणीने पावन झालेली ही पवित्र महाराष्ट्र भूमी. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, संत गाडगेबाबा यासारखे महापुरुषही मराठी मातीनेच भारताला दिले. सात बेटांचे शहर म्हणून ओळखली जाणारी व देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई ही याच महाराष्ट्राची राजधानी आहे. देशाला सर्वात जास्त महसूल हा मुंबईतूनच मिळतो, पण याच मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव दिल्लीश्वरांनी घातला, तेंव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी १०५ हुतात्म्यांना बलिदान द्यावे लागले. याच १०५ हुतात्म्यांमुळे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्राची निर्मिती होऊन आज ६३ वर्ष पूर्ण झाली आहेत. या ६३ वर्षात महाराष्ट्राने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे. कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण, आरोग्य, शेती, जलसिंचन, विज्ञान, तंत्रदान, उद्योग, व्यापार अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राने नेत्रदीपक प्रगती केली आहे. आज महाराष्ट्र देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.

जगाला हेवा वाटावा असा निसर्ग महाराष्ट्राला लाभला आहे. एकिकडे उंचच सह्याद्रीच्या रांगा तर दुसरीकडे ७२० किलोमीटरचा निसर्गरम्य समुद्रकिनारा. महाराष्ट्राला निसर्गाने भरभरून दान दिले आहे. असे असले तरी आजही महाराष्ट्रात अनेक समस्या आणि आव्हाने आहेत. महाराष्ट्रातच आज मराठी भाषेची गळचेपी होऊ लागली आहे. परप्रांतीयांच्या लोंढ्यामुळे मुंबई सारख्या शहरातून मराठी माणूस हद्दपार होतो की काय, अशी शंका येऊ लागली आहे. अमृतातही पैज जिंकणारी असे जीचे वर्णन केले जाते, त्या मराठी भाषेची महाराष्ट्रातच उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा बोलायला तरुणांना लाज वाटते. आज मराठी तरुण मराठी भाषा बोलण्याऐवजी हिंदी व इंग्रजी बोलण्याला प्राधान्य देत आहे. हिंदी व इंग्रजीच्या आक्रमणामुळे मराठी भाषा महाराष्ट्रातच मागे पडू लागली आहे. पालकही आपल्या पाल्यांना मराठी ऐवजी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करू लागले आहेत. विद्यार्थ्यांअभावी मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण करूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला जात नाही. सर्वसामान्य नागरिकांपासून, साहित्यिक तसेच राज्यातील अनेक नेत्यांनी ही मागणी करूनही शासन दरबारी त्याला वाटण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत.

आज राज्यातील ४० टक्के जनता ही तरुण आहे. पण, या तरुणांच्या हाती रोजगार नाही. राज्यात बेरोजगारीने कळस गाठला आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही हाती काम नसल्याने तरुणांना नैराश्य आले आहे. जर या तरुणांना नैराश्यातून बाहेर काढायचे असेल तर सरकारने रोजगार वाढीसंदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. महाराष्ट्रातील तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. जर या तरुणांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतला तर महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल.

माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातील तरुण सुशिक्षित असेल पण बेरोजगार नसेल. तरुणांप्रमाणेच शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे अनेक प्रश्न आहेत. तरुणांप्रमाणे शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे प्रश्न सुटले तर महाराष्ट्रात पुन्हा एकदा शेतकरी, कष्टकरी वर्गाचे राज्य येईल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र उद्योग व्यवसायात अग्रेसर असेल. शेतीसहित अनेक लहान मोठ्या उद्योगांचा विकास झालेला असेल तो ही पर्यावरणाचा ऱ्हास न होता.

माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात पी जी ते केजी शिक्षण मोफत असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात सर्वांना परवडेल अशा दरात आरोग्यसेवा उपलब्ध असेल. पैसे नाहीत म्हणून कुणाचाही जीव जाणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात भ्रष्टाचाराला थारा नसेल. शिवशाहित ज्याप्रमाणे माताभगिनी सुरक्षित होत्या, तशाच माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातही माताभगिनी सुरक्षित असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात जात-पात, धर्म -वंश याला थारा नसेल. भय, भूक आणि भ्रष्टाचार मुक्त असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्राची कीर्ती केवळ भारतातच नाही तर जगात पसरेल. संपूर्ण जगाला हेवा वाटेल असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# समाजापर्यंत साहित्य पोहोचवणारे साहित्य सम्राटचे कार्य – कवी ठोकळे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, हडपसर (पुणे) :** अंतरीच्या भावना, कवितेचा उमाळा, हृदयाची भाषा ही सामान्य माणसांपर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी साहित्य सम्राट पुणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोदजी अष्टुळ यांचे हडपसर सारख्या उपनगरात खूप मोठे कार्य आहे. सुरुवातीला खूप अडचणी आल्या. हडपसर मध्ये साहित्यिक कार्य चालणारच नाही. असे म्हणणाऱ्यांना अष्टुळ यांनी विविध उपक्रमांद्वारे सातत्याने आज पंधरा वर्षात १८३ कवी संमेलने घेऊन सिद्ध केले. ते म्हणतात काळीज असते तिथे कविता असतेच. खऱ्या अर्थाने समाजापर्यंत कविता रुजवण्याचे काम अष्टुळ यांनी केलेले आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. असे गौरवोद्गार प्रसिद्ध कवी दत्तू ठोकळे यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले.




साहित्य सम्राट पुणे संस्थेने हडपसर येथील नीलकंठेश्वर महादेव मंदिर येथे महामानवांच्या जयंती निमित्त १८३ व्या कवी संमेलनाचे आयोजन केले होते. यावेळी विचारपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेते आणि दिग्दर्शक अर्जुन नोटके उपस्थित होते. त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. नीलकंठेश्वर महादेव मंदिराच्या प्रसन्न वातावरणात महामानवांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या वास्तवादी कविता कवी कवयित्री यांनी कविता आणि गझलांमधून सादर केल्या. यामध्ये दत्तू ठोकळे, अशोक शिंदे, गौरव नेवसे, विनोद अष्टुळ, मेघराज पाटील, सुभाष महाराज बडधे, शारदा बडधे, गुलाबराजा फुलमाळी, नवनाथ तोडकर, उदय बनसोडे, ॲड. राणी गुंबाडे, विजय माने, आनंद महाजन अशा दिग्गज कवी कवित्रींनी वास्तववादी विचारातून रसिक जनांची आणि भक्तगनांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि बहारदार सूत्रसंचालन विनोद अष्टुळ यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉक्टर आनंद महाजन यांनी व्यक्त केले.

## आहत...

काही जण प्रति पक्षां
देतात सल्ले अनाहूत
युं करावे न् त्युं करावे
उगाच उसळतो ऊत

अ व्यापारेशू व्यापार
व्यवसाय रे अंगिकृत
सल्लेहल्ले कसेसुध्दा
असे अगदी अ प्रकृत

विकृती मनी साठली
नेते म्हणता सुसंस्कृत
शिकवू पाहतो वर्गाला
अशिक्षित अतिआहत

ठरावीक वेळे ठरलेले
बातमीपत्र करे प्रस्तुत
घात करी अखीलपक्ष
असले प्रवक्ते उपद्रुत

शांतराहता बरे होईलं
करावे पक्षांस उपकृत
डचमळत राही मनात
स्वभाव वृत्ती पराकृत

सल्ले सुध्दा विचीत्रसे
विचार वेगळे अनश्रुत
भरकटून टाके जहाज
पचकून कधीअप्रस्तुत

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# ३६ वर्षानंतर भरला अनोखा स्नेहमेळावा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, शनिशिंगणापूर :** सन १९८८-८९ ते २०२४ अहमदनगर येथील प्रगतकला महाविद्यालयातील १९८८ -८९ या वर्षातील फाऊंडेशन ए टी डी च्या वर्गातील मित्र परिवारांचा स्नेहमेळावा शनिशिंगणापूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ३६ वर्षानंतर सर्व मित्र महाराष्ट्रातून विविध ठिकाणाहून मित्र एकत्र शनिशिंगणापूर येथे जमा झाले. प्रकाश मचे सर यांनी स्थानिक नियोजन अत्यंत उत्तम व जबाबदारीने पूर्ण केले. श्रीहरी पवळे यांनी मुंबई येथून येऊन दर्शनी भागात स्वागताची आकर्षक रांगोळी काढली. विशेष म्हणजे दर्शनासाठी आलेले भाविकांनी आणि गावकऱ्यांनी श्रीहरी पवळे यांनी काढलेली शनि महाराजांची रांगोळी स्टेटसला ठेवून व प्रत्यक्ष कौतुक करून आनंद व्यक्त केला. सकाळी १० वाजे पर्यंत शनिशिंगणापूर येथे जमल्यावर सर्वजण आनंदाने एकमेकांची गळाभेट घेऊन स्वागत करीत होते. प्रत्येकाचे उर आनंदाने भरले होते. प्रत्येकाच्या छातीवर मैत्रीचा सिम्बॉल असलेला बॅज लावण्यात आला. त्या नंतर सर्वांनी आपली ओळख सांगून आपला जीवनपट आपल्या मनोगतातून व्यक्त केला. मनोगत संपल्यावर मैत्रीवर सुंदर असा शेर सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. दुपारी १.३० वाजता संस्थांच्या भोजनालयात स्वादिष्ट भोजन घेतले

नंतर सर्वांना श्रीहरी पवळे यांनी फेटा बांधून व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. श्रीहरी पवळे ने आणलेले सुंदर सन्मानपत्र व रवी मुंतोडे ने बनवून आणलेले सुंदर प्रिंट




केलेले कप देऊन सर्वांचा सन्मानीत करण्यात आले. राजाराम सरोदे.अशोक शेळके सर हे सेवानिवृत्त होणार असल्याने व उत्तम कांडेकर सर हे मुख्याध्यापक पदी नियुक्ती झाल्याबद्दल या सर्वांचा शाल बुके देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी शनी देवाचे सर्वांनीसामूहिक दर्शन घेऊन आमची मैत्री कायम अशीच राहू दे अशी प्रार्थना देवाकडे करून सर्वांनी एकमेकांची भेट घेऊन आनंदाने पण भावूक अंतकरणाने निरोप घेतला. २८ एप्रिल हा दिवस आमच्या सर्वांच्या जीवनातील एक अविस्मरणीय दिवस समजला जाईल. काही मित्र त्यांच्या महत्वाच्या वैयक्तिक अडचणी मुळे येऊ शकले नाही त्या बद्दल त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली.

# लोकलमधून पडून युवतीचा मृत्यू
## वाढत्या अपघाताला जबाबदार कोण?



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२९, डोंबिवली :** डोंबिवलीत राहणाऱ्या अवधेश दुबे याचा लोकल मधून पडून मृत्यू झालेली घटना ताजी असतानाच सोमवारी सकाळी ८ ते ९ च्या दरम्यान डोंबिवलीत राहणाऱ्या २६ वर्षीय तरुणीचा लोकल मधून पडून मृत्यू झाला.

डोंबिवली पूर्व इथे राहणारी युवती रिया श्यामजी राजगोर वय वर्ष २६ ही ठाण्याला जॉबला जात असे, रोजच्या प्रमाणे रियाने सकाळी ८ ते ९ च्या दरम्यान मुंबई फ़ास्ट लोकल पकडली व गर्दीच्या कारणास्त्वे तिला दरवाजात उभे रादावे लागले व गर्दीमुळे तिचा हात सुटून ती खाली कोसळली परिणामी तिचा जागेवर मृत्यू झाल्याचे समजते.

अश्या रोजच्या जीवघेण्या गर्दीतून किती तरुण लोकांचे जीव जाणार ? या मधे नक्की कोणाची चूक ?रेल्वे प्रशासन यावर उपाययोजना करणार का?असा सवाल नागरिक विचारात आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## उरण कोट गावात 'सबसे कातील गौतमी पाटीलचा' नृत्य जलवा



**अक्षराज : तृप्ती भोईर**

**दि.२९, उरण (रायगड) :** उरण कोट गावचे ग्रामदैवत श्री राघोबा देवपालखी उत्सव सोहळा २०२४ चे १ मे रोजी आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने कोट गाव ग्राम स्थ व पंच कमिटीच्या वतीने दिनांक २८ एप्रिल ते १ मे पर्यंत विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार २८ एप्रिल रोजी लावणीसम्राज्ञी सबसे कातील गौतमी पाटील हिचा नृत्य अविष्कार सादर करण्यात आला.

रंग देवतेला श्रीफळ अर्पण करून या बहारदार कार्यक्रमाची सुरुवात झाली.श्री गणेश वंदना, लावणी, पाश्चात्य संगीतावर आधारीत नृत्य, लोकगीते, उडती गाणी, पायाला ठेका धरणारी गाणी सादर करुन गौतमी पाटील व तिच्या सहकारी नृत्यांगना ने रसिक प्रेक्षकांना नाचायला लावले. हजारोंच्या वर प्रेक्षकांनी गौतमी पाटील च्या अदाकारी ची मजा घेतली. गौतमी पाटील ने प्रत्येक सादरीकरणानंतर प्रेक्षकांची टाळ्यांची व शिटी ची दाद मिळवली. उरण कोट गाव येथील श्री राघोबादेव पालखी सोहळा दरवर्षी मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो आणि याही वर्षी या सोहळ्याची सुरुवात विविधतेने नटलेल्या कार्यक्रमाने झाली आहे.

## पारनेर तालुक्यातील अनेक मार्गावरील बसेस बंद शाळेतील विद्यार्थ्यांची व प्रवाशांची गैरसोय



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अ.नगर) :** पारनेर तालुक्यातील अनेक मार्गावरील एस.टी. बसेस अचानक बंद केल्याने प्रवाशांना हाल आपेष्टांना तोंड द्यावे लागत आहे. शाळा, महाविद्यालय बंद असल्याच्या कारणाने प्रवासी मिळत नाही म्हणून बसेस बंद केल्याचे कारण सांगितले जाते. पारनेर आगाराच्या बसेस अतिशय जुन्या झाल्याने त्या वारंवार नादुरुस्त होतात, बसेसची संख्याही मागणीपेक्षा कमी आहे, त्यामुळे वाहक व चालक यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. वरिष्ठांकडे मागणी करूनही नवीन बसेस व सुस्थितीतील बसेस पारनेर आगाराला उपलब्ध होत नाहीत. सध्या शाळा, महाविद्यालयांना उन्हाळ्याच्या सुझ्या लागल्याने विद्यार्थी बसेसने प्रवास करत नाहीत.

त्यामुळे बऱ्याच मार्गावरील बसेस रिकाम्या धावत होत्या. प्रवासी संख्या कमी असल्याने तोट्यात चालवाव्या लागतात. या कारणाने नगर – जवळा, वासुंदे, कळस, विसापूर व इतर ठिकाणच्या रात्री मुक्कामी बसेस नाईलाजाने बंद कराव्या लागल्या आहेत. जूनमध्ये शाळा, महाविद्यालये सुरु झाल्यानंतर या मुक्कामी व इतर बंद केलेल्या बसेस पुन्हा पूर्ववत सुरु करण्यात येणार आहेत. परंतु बसेस अशा अचानक बंद केल्याने तसेच खासगी वाहनांची संख्या वाढल्याने खासगी प्रवासी वाहतूकही जवळपास बंद झाल्यात जमा असल्याने स्वतःचे वाहन नसलेल्या प्रवाशांना प्रचंड हालअपेष्टांना तोंड द्यावे लागत आहे. सध्या सुरु असलेल्या यात्रा जत्रांचा हंगाम, धुमधडाक्यात सुरु असलेली लग्न सराई व सुगीचा हंगाम असलेला लोकसभा निवडणुका, त्यातच प्रचंड कडक उन्हाळा, हे सर्व एकत्रित आल्याने जीवाची घालमेल होत आहे, त्यामुळे दुचाकीवर प्रवास करणे जिकिरीचे झाले आहे. सर्वसामान्यांना एसटी बसेस शिवायपर्यायच नाही.


## केंद्राची कांदा निर्यातबंदी ही मतदारांची दिशाभूल स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष घनवट यांचा आरोप



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहमदनगर :** केंद्र सरकारने कांदा निर्यात सुरू करणार असल्याची खोटी बातमी देऊन शेतकऱ्यांची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी केला आहे. कांदा उत्पादकांची नाराजी दूर करून मते मिळवण्याचा हा मोदी सरकारचा कुटील डाव असल्याचे त्यांनी म्हटले आहे. गुजरातमधून पांढरा कांदा निर्यात करण्याच्या निर्णयानंतर महाराष्ट्रातील कांदा उत्पादक कमालीचे नाराज झाले होते. याचा परिणाम सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर होऊ नये म्हणून केंद्र सरकाने ९९ हजार १५० टन कांदा निर्यात करणार असल्याची खोटी माहिती प्रसारित केली, असे घनवट यांनी आपल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे. प्रत्यक्षात एप्रिल २०२३ पासून आतापर्यंत विविध देशांना निर्यात केलेल्या कांद्याची ही एकूण बेरीज आहे. नवीन कांदा निर्यातीबाबत कोणताही आदेश नाही. हा निर्यात होणारा कांदा शेतकऱ्यानंकडून खरेदी होत नाही. या निर्यातीसाठी टेंडर काढले जाते. तसेच एनसीईएलमार्फत निर्यात केला जात आहे. निर्यातबंदी मुळे कांद्याचे दर पाडले आहेत हे सर्वांना माहिती आहे. कांदा उत्पादक नाराज आहेत. हि नाराजी दूर करण्यासाठी कांदा उत्पादकांची दिशाभूल केली जात आहे. कांदा उत्पादकांच्या गरिबीला, कर्जाला व दुरवस्थेला मोदी सरकारचे निर्णय जबाबदार आहे. सरकारचा पराभव करणे आवश्यक आहे. कांदा उत्पादक सुद्धा सरकार पाडू शकतो हे दाखवून देण्याची वेळ आली आहे. असे मत घनवट यांनी व्यक्त केले आहे. चौकट: निवडणूक जिंकण्यासाठी दिशाभूल निर्यातबंदी मुळे कांद्याचे दर पाडले आहेत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी नाराज आहेत. त्यांची ही नाराजी दूर करण्यासाठी दिशाभूल केली जात आहे. नवीन कांदा निर्यातीसाठी कोणताही आदेश पारित केलेला नाही. कांदा पट्ट्यात सध्या निवडणूक प्रचार सुरू होत आहे. मतदारांची नाराजी दूर करण्यासाठी मोदी सरकारने प्रसार माध्यमांद्वारे खोटी माहिती प्रसारित केली आहे. हि शेतकऱ्यांची चक्क दिशाभूल आहे.

## धुंडिराज गोविंद उर्फ दादासाहेब फाळके !



दादासाहेब फाळके हे भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक आहेत. ते भारतीय चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथाकार आणि चित्रपट महर्षी म्हणूनही ओळखले जातात. त्यांचे पूर्णनाव धुंडिराज गोविंद फाळके असे होते, पण ते दादासाहेब या नावानेच अधिक प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म दि.३० एप्रिल १८७० रोजी महाराष्ट्राच्या नासिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे झाला. त्यांचे वडील गोविंदशास्त्री उर्फ दाजीशास्त्री व मातोश्री द्वारकाबाई होत. दाजीशास्त्री स्वत: संस्कृत भाषेचे विद्वान आणि त्र्यंबकेश्वर मंदिराचे पुजारी होते. त्यामुळे दादासाहेबांचे बालपण धार्मिक वातावरणात व्यतीत झाले. दादासाहेब १२ वर्षांचे असताना दाजीशास्त्रींनी मुंबईतील एलफिन्स्टन कॉलेज येथे संस्कृतचे प्राध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली. त्यामुळे फाळके कुटुंब मुंबईला स्थलांतरित झाले.

दादासाहेबांना लहानपणापासूनच वेगवेगळ्या कला शिकण्याची आवड होती. त्यामुळे मुंबईच्या मराठा हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर सन १८८५मध्ये त्यांनी जे.जे.स्कूल ऑफ आर्ट्स येथून एक वर्षाचा चित्रकलेचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. मग बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या कलाभवनातून त्यांनी तैल रंगचित्रण, जल रंगचित्रण, वास्तुकला आणि नमुना प्रतिरूपण– मॉडेलिंग यामध्ये प्रावीण्य मिळवले. याचबरोबर त्यांनी छायाचित्रण, प्रकाश शिलामुद्रण– फोटोलिथोग्राफी या व्यावसायिक कलांचेही शिक्षण घेतले. त्यात विविध प्रयोगही केले. अहमदाबाद येथील सन १८९२ मधील औद्योगिक प्रदर्शनात त्यांच्या आदर्शगृहाच्या प्रतिकृतीला सुवर्णपदक मिळाले. त्यांनी गुजरातमधील गोध्रा येथे व्यावसायिक छायाचित्रकार म्हणून व्यवसाय सुरू केला. पण तेथे त्यांचा जम बसला नाही. ते सन१९०० साली बडोद्याला परतले. मात्र त्यांच्यातला हरहुन्नरी माणूस त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. त्यांनी एका जर्मन जादूगाराकडून जादूची कला शिकून प्रोफेसर केल्फा या नावाने जादूचे प्रयोग दाखवायला सुरुवात केली. हे प्रयोग त्यांनी एका लघुपटात चित्रितही केले.

दादासाहेबांचा पहिला विवाह सन १८८६मध्ये झाला. पण त्यांच्या पत्नीचे व मुलाचे गुजरातमध्ये प्लेगच्या साथीने सन १९०० साली देहावसान झाले. त्यानंतर दोन वर्षांनी त्यांचा विवाह सरस्वतीबाई– पूर्वाश्रमीच्या गिरिजा करंदीकर यांच्याशी झाला. सात मुले व दोन मुली असा त्यांचा परिवार बहरला. सरस्वतीबाईंनी चित्रपट निर्मितीच्या सर्वच क्षेत्रांत दादासाहेबांना मोलाची मदत करत आयुष्यभर साथ दिली. दादासाहेबांनी चित्रपट निर्मितीच्या तंत्राचा अथक परिश्रम करून अभ्यास केला. परिणामस्वरूप १९११–१२च्या काळात अंधत्वही आले होते. पण चिकाटीने त्यांनी त्यावर मात केली. तत्कालीन भारतीय समाजव्यवस्थेत चित्रपट निर्मिती करताना सामाजिक अडचणींसोबतच आर्थिक अडचणींनाही त्यांना सामोरे जावे लागले. चित्रपटात काम करण्यासाठी स्त्री कलावंतच काय, पुरुष कलावंतही तयार होत नसत. अशावेळी गरज पडल्यास ते स्वत: किंवा कुटुंबियांपैकी कोणीतरी ते उभे करीत. सुरुवातीच्या त्यांच्या चित्रपटातील स्त्री पात्रांच्या भूमिकाही त्यांनी पुरुषांकडूनच करून घेतल्या. त्यांना अनेक कला अवगत असल्यामुळे त्याचा उपयोग त्यांनी चित्रपटनिर्मिती करताना केला. त्यामुळे ते चित्रपट तांत्रिकदृष्ट्या उत्तम असत. त्याकाळी परदेशातही चित्रपट निर्मिती करण्याचा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवण्यात आला. पण त्या मोहाला बळी न पडता त्यांनी भारतातच चित्रपट निर्मिती केली. आपल्या देदीप्यमान कारकीर्दीत त्यांनी एकूण ९५ चित्रपट आणि २६ लघुपटांची निर्मिती केली.

दादासाहेबांनी सन १९०३ साली भारतीय पुरातत्त्व खात्यात प्रारूपकार आणि छायाचित्रकार म्हणून नोकरी पत्करली. या फिरतीच्या नोकरीमुळे त्यांना भारतातील अनेक वास्तुशिल्पे पाहता आली. परंतु स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या वंगभंग चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. चळवळीला साथ देत त्यांनी ही सरकारी नोकरी सोडून दिली. त्यांनी लोणावळ्याला फाळके एनग्रेव्हिंग अँड प्रिंटिंग प्रेस– वर्क्स ही संस्था सुरू केली. पुढे ती दादरला हलविली. तिचे रूपांतर लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्समध्ये झाले. सन १९०९मध्ये ते जर्मनीहून तीनरंगी मुद्रणप्रक्रियेचे अद्ययावत तांत्रिक शिक्षण घेऊन भारतात परतले व ही संस्था त्यांनी भरभराटीस आणली. मात्र दहा वर्षांत व्यवसायातील भागीदारांबरोबर बेबनाव झाल्यामुळे ते वेगळे झाले. यामुळे दादासाहेब उद्विग्न होते. याच दरम्यान त्यांनी मुंबईमध्ये लाईफ ऑफ जिझस ख्राईस्ट– ख्रिस्ताचे जीवन हा मूक चित्रपट पाहिला आणि त्यांच्या आयुष्यातले ध्यासपर्व सुरू झाले. स्वदेशी चित्रपट बनवायचा या विचाराने त्यांना झपाटून टाकले. भारतीय इतिहासातील महान व्यक्तिमत्त्व असलेल्या श्रीकृष्णाच्या जीवनावरही असाच चित्रपट बनवायचा ध्यास घेऊन अथक प्रयत्नांनी त्यांनी लंडनला जाऊन चित्रपटविषयक तांत्रिक ज्ञान मिळवले. तेथे आवश्यक यंत्रसामग्री आणि कच्चा माल मागविण्यासाठी नोंदणीही केली. ते भारतात परतले. तेथील वास्तव्यात प्रसिद्ध चित्रपट निर्माते सेसिल हेपवर्थ यांच्याशी त्यांचा परिचय झाला. सर्व सामग्री मे महिन्यामध्ये हाताशी आल्यावर प्रयोगादाखल जून–जुलैमध्ये रोपट्याची वाढ हा एका मिनिटाचा लघुपट तयार करून काही निवडक व्यक्तींना दाखवला. त्याचा योग्य परिणाम वाटल्याने पत्नीचे दागदागिने गहाण ठेवून भांडवल उभे केले. लवकरच मुंबई– दादर येथे फाळके चित्रपट निर्मितिगृहाची स्थापना केली. सहा महिन्यात मुंबईच्या कोरोनेशन चित्रपटगृहामध्ये त्यांनी निर्मिलेला राजा हरिश्चंद्र हा पहिला भारतीय बनावटीचा मराठी पूर्ण बोलपट सन १९१३ साली प्रदर्शित झाला. राजा हरिश्चंद्रच्या यशाने खऱ्या अर्थाने भारतीय चित्रपटसृष्टीचा एक व्यवसाय म्हणून पाया रचला गेला. या चित्रपटाकरिता लेखक, छायालेखक, रंग वेशभूषाकार, कलादिग्दर्शक, संकलनकार, रसायनकार आदी सर्व भूमिका दादासाहेबांनी पार पाडल्या. या चित्रपटांनंतर त्यांनी मोहिनी भस्मासूर व सत्यवान सावित्री या चित्रपटांची निर्मिती केली. यांनाही चांगले व्यावसायिक यश लाभले. त्यांनी सन १९१४मध्ये पुन्हा इंग्लंडला प्रयाण केले. या वास्तव्यात त्यांनी निर्मिती केलेले चित्रपटही तेथील निर्मात्यांना दाखवले. या चित्रपटांतील तांत्रिक अंगांचे परदेशातही खूप कौतुक झाले.

भारतीय चित्रपट व्यवसायास २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईतील महोत्सवात कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून फाळके यांना पाच हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. आर्थिक विवंचनेतच वयाच्या ७४व्या वर्षी दि.१६ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांचे नासिक येथे निधन झाले.

**!! जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!**

**एन.कृष्णकुमार, से.नि.अध्यापक.**
**मु. रामनगर, गडचिरोली.**
**जि. गडचिरोली, मोबा. ७७७५०४१०८६.**

## कपिल पाटिल बाळ्या मामात होणार काट्याची टक्कर !



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२९, शहापूर (ठाणे) :** भिंवडी तालुक्यातील काल्हेर गावचा आमदार खासदार नसला तरी घराबाहेर पडला की मागे पुढे गाड्याचा गराडा कायम कुठल ही पद नसताना सदैव प्रचंड गर्दीतील हा नेता,जनतेच्या मनातील बाळ्या मामा ला मामा किंवा दादा बोलणारेच जास्त, सुरेश म्हात्रे म्हणजे फक्त कागदोपत्री नांव होय.

१६ व्या वर्षी भाड्यांन रिक्षा वाला, नोकर, ते कॉन्ट्राक्टर निवडणुकात पराभव झाला तरी लोंकाचे प्रश्न सोडवित राहिल्याने सोबत जातपात न पाहता दारी आलेल्या याचकास मदत करणे हा वसा जोपासत असल्याने व गोडावूनच्या माध्यमातुन हजारो तरूणांना रोजगार उपलब्ध करून दिल्याने लाखो कुंटूबांची दुवा लाभली असून सन २०१८–१९ च्या कोरोना महामारीत हजारो गोरगरीब अदिवासी कुंटूबांना मदतीचा हात देणारा हया नेत्याला वाडी वस्तीवर साहेब नव्हे तर बाळ्या मामा ह्या नावाला पसंती दिली जातेय.

राज कारणाचा फायदा मामा ला घेता आलाच नाही,सन २००९ शिवसेवा विधानसभा उमेदवारी २०१४ ला मनसे उमेदवारी शिवसेना संपर्क प्रमुख जबाबदारी २०२१ कॉग्रेस प्रवेश २०२२ला शिंदे गटात प्रवेश तर जानेवारी २०२४ ला शरद पवार गटात प्रवेश व महाविकास आघाडीची उमेदवारी कुठल्याच पक्षात फायदा न घेता केवळ पक्षांतर करून सुद्धा बाळ्या मामा ची ईतकी हवा कां तर बाळ्या मामा एक दिलदार व्याक्ती महत्व असल्याने गोरगरीबांसाठी सदैव मदतीसाठी तत्पर असल्याने सर्वसामान्य नागरिकात त्याच्या नावा अपुलकी दडून आहे,दोन वेळा भिवंडी लोकसभेचे खासदार असलेले व देशाचे पंचायतराजमंत्री पदि विराजमान असलेल्या भाजपाच्या कपिल पाटलां समोर देखील हे दिलदार अव्हाण ठरल्याने त्यांची उमेदवारी जाहिर होताच गोडावूनचा ससेमिरा मागे लावण्याची वेळ आली तर एक प्रकारे या सर्वसामान्य अशा मामने भाजपाच्या जुमला विकासाला दणका,देत नावाची हवा कायम ठेवला आहे. भिंवडी लोकभेत गेल्या दोन निवडणूकीत खासदार तथा पंचायतराजमंत्र्यांना सक्षम असा विरोधक नव्हताच, त्यामुळे सारेच अलबेल चालले होते, त्यांचे कट्टर राजकिय विरोधक म्हणून ओळखले जाणारे सुरेश म्हात्रे बाळ्या मामा निष्ट कळंकित,दानशूर व अभ्यासु व्याक्तीमत्व अशी त्यांची ओळख असलेल्या मामाला मात्र व्यासपिठ सापडत नव्हते,कायम प्रबळ दावेदार असून देखाल त्यांना हवं तस पक्षीय बळ मिळत नव्हते, मात्र ३० जून २०२२ ला ठाणे जिल्हयातील भूकंपात राजकिय परझड झाली फासे पालटले व राष्टवादिचे सर्वेसर्वा चाणक्य शरद पवारांनी या जिल्हयात योग्या फासे टारून बाळ्यामामा यांना राष्ट्रवादीत प्रवेश देऊन मुख्यमंत्र्यासह, भाजपाचा कार्यक्रमच करेक्ट केला गेला,दोन वेळा भरघोस मतानी विजयी झालेल्या खासदार,पंचायतराजमंत्र्याना प्रखर विरोध करणा–या बाळ्या मामाना देखील व्यासपिठ गावल.

२०२४ च्या लोकलभेच्या ऐन मोक्याला गेल्या महिना भरापासून ते पंचायतराजमंत्र्याचा जुमला विकास जाहिररित्या चांगलाच चव्हाट्यावर आणीत होतेच.

पंधरा दिवस उलटले या जागेचा तिढा सुटत नव्हता तेव्हा संभाव्य उमेदर हा जाहिर होत नसल्याने भाजपाचे एकतर्फी अलबेल चालले होते. परंतु शरदपवारांचे फासे योग्य पडले व मुख्यमंत्र्यासह भाजपाच्या जुमला विकासाचा कार्यक्रम करेक्ट केला गेला आहे.

भाजपा च्या पंचायतराज मंत्र्याकडे कार्यकर्त्याची फौज उभी असून गावोगाव पिंजून काढण्यात त्यांनी आघाडी घेतली आहे,मात्र मतदार हा भाजपावर नाराज असल्याचे बोलले जातेय तर बाळ्या मामा सोबत कार्यकर्ते नाहित प्रचारयंत्रना नसली तरी मतदार मात्र पाठिशी असल्याचे चित्र पाहता ह्या दोघातच काट्याची टक्कर होणार अस चित्र दिसून येत आहे.

## निवडणुकी आधीच निलेश लंकेनी विखेंना दाखवले आसमान


**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहमदनगर :** अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात निलेश लंके यांनी उमेदवारी करून रंगत आणली आहे.विखे कुटुंबाचे नेहमी वर्चस्व स्थानिक पुढाऱ्यांवर होते.यावेळी देखील विखे यांच्याच इशाऱ्यावर अनेक डमी उमेदवार उभे होते.

निलेश लंके यांच्या नावाचे साधर्म्य असणारा डमी निलेश साहेबराव लंके, एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडी असे वेगळे फॅक्टर ठरणारे उमेदवारांची माघार झाल्याने लंके यांचे पारडे अधिकच जड झाले आहे अशी चर्चा मतदारसंघात सुरू झाली आहे. विखे आणि लंके यांच्यात असणारी लढत घासून होईल अशी शक्यता होती. इतर पक्षाचे आणि मतांचे ध्रुवीकरण होणारे पत्ते विखेंनी टाकले होते.

या डावपेचात निलेश लंके यांनी अक्षरशः विखे यंत्रणेला कात्रजचा घाट दाखवला आहे.विखेंनी टाकलेला प्रत्येक डाव त्यांच्यावर उलटला असून निवडणूक सुरू होण्याआधीच लंकेचे गणित जुळताना दिसते आहे. धनशक्ती विरोधी जनशक्ती असणारी ही लढाई निर्णायक टप्प्यावर गेली आहे. सुजय विखे पाटील यांच्यावर स्वपक्षाअंतर्गत असणारी नाराजी मोठी आहे.मोदींच्या नावावर मते मागितले तरी लोक निलेश लंके हे देखील कट्टर देशभक्त आहे या उलट विखे यांनी भाजपाला नेहमी अपशब्द वापरले होते.मोदी देशात पण जिल्हात काम करणारा आणि जनतेला उपलब्ध असणारा सेवा करणारा खासदार हवा आहे अशी जनभावना उफाळून आल्याने विखे यांची नामुष्की झाली आहे.आर्थिक रसद टाकून पेरलेले डाव यशस्वी करण्यासाठी विखे परीवार पहाटे पर्यंत झगडत होता मात्र निलेश लंके यांनी काटशाह देऊन विखे यांना कुस्ती सुरू होण्या आधीच डाव टाकून आसमान दाखवले आहे.

# आपल्या सत्कार्याने नवचैतन्याचा झरा निर्माण करणारे - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



आपल्या सत्कार्याच्या किर्तीचा सुगंध सबंध जगभर बसून पसरविणारे संत तुकडोजी महाराज. समाजोद्धारातून आपले विचार पोचवत जगाला मानव धर्म शिकवणारे या संताचे कार्य महान असून त्यांनी सदगुणाचा उपदेश, समाज जागृती, राष्ट्रउन्नती, सर्वधर्मसमभाव,उद्योगशीलता अशा एक ना अनेक समाजाविषयी आपल्या प्रवचनाच्या,कीर्तनाच्या, भाषणाच्या माध्यमातून प्रखरतेने समाजापुढे मांडत समाज जागृतीचे महान कार्य केले.लोकशिक्षण, समाजसुधारक,धर्मचिंतक,कवी, शिक्षकतज्ञ म्हणून सबंध भारतभर ज्यानी आपले कार्य केले. त्यांच्या ग्राम गीतेतील विचार समाजाला आजही मार्गदर्शक,दिशादर्शक ठरते.ज्यानी त्यांच्या सामाजिक कार्यातून प्रगतीकडे नेण्याच्या मार्ग दाखवला. आपल्या ज्ञानाच्या,कार्याच्या माध्यमातून परिवर्तनवादी समाज घडविण्याचे कार्य केले आहे.सर्व धर्म समभाव हे या महान संताचे विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते, समाज सुशिक्षित,सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावा ,गावाने देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी जे नेहमी प्रयत्नशील राहिले. अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात यासाठी ज्यानी अविरत प्रयत्न केले. असे एक महान संत ज्यांनी 'ज्ञान सेवा हीच ईश्वर सेवा' आहे हा उपदेश दिला, असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होय. त्यांनी भाषण, कीर्तन,भजनाच्या माध्यमातून राष्ट्र जोडण्याचे,राष्ट्र जागृतीचे महान कार्य केले.अशा या महान राष्ट्रसंत तुकडोजी महाराजची आज जयंती त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन..

अशा या महान राष्ट्रसंतांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील 'यावली' या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बंडोजी उर्फ पांडुरंग इंगळे आईचे नाव मंजुळा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची नाव 'माणिक' असे होते, त्यांचे गुरू अडकोजी महाराज हे त्यांना 'तुकडोजी' या नावाने संबोधत असत म्हणून पुढे त्यांना तुकडोजी हे नाव झाले,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी पशुहत्या,व्यसनमुक्ती,अस्पृश्योद्धार, जातीनिर्मूलन,अंधश्रद्धा निर्मूलन, महिला उद्धार,राष्ट्रनिर्माण चे कार्य केले. त्यांनी ग्रामीण पुनर्निर्माणा चे कार्य केले.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत पंचक जे ग्रामगीतेचे अध्याय आहेत, ते-सदधर्म मंथन पंचक, लोक वशीकरण पंचक,ग्रामनिर्माण पंचक,दृष्टीपरिवर्तन पंचक,संस्कार संशोधन पंचक,प्रेम धर्म स्थापन पंचक,देवत्व साधन पंचक, आदर्श जीवन पंचक या पंचका ला दिलेल्या नावावरून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कल्याणकारी बहुमुखी कार्याचे दर्शन घडते. त्यांनी केलेले कार्य समाजाला नवचैतन्य देणारी आहे, समाजातील प्रत्येक घटकाचा विचार त्यांच्या विकासात्मक दृष्टिकोनातून महाराजांनी केला. त्यांनी ग्रामीण विविध समस्यांवर मुलभूतरित्या विचार करून समस्या सोडवण्याचे कार्य केले,तसेच उपाययोजनाही सुचविल्या आहेत त्या आज आपल्याला कामी आल्या आहेत.

**या भारतात बंधुभाव नित्य वसू दे!**
**दे वरचि असा दे.**
**हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे!**
**मतभेद नसू दे!!**
**नांदोत सुखे गरीब-अमीर एक मतांनी!**
**मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी**
**स्वातंत्र्य-सुखा या सकलांमाजि वसू दे!**
**दे वरचि असा दे!!**
**सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना!**
**हो सर्व स्थळी मिळुनी समुदाय-प्रार्थना!**
**उद्योगी तरुण शीलवान येथ असू दे!**
**दे वरचि असा दे!!**
**जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही!**
**अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी!**
**खळनिंदका-मनीही सत्य न्याय वसू दे!**
**दे वरचि असा दे!!**
**सौंदर्य रमो घराघरात स्वर्गीयापरी!**
**ही नष्ट होउ दे विपत्ती भीती बोहरी**
**तुकड्यास सदासर्वदा सेवेत वसू दे!**
**दे वरचि असा दे!!**

हा 'एकीचा' संदेश तुकडोजी महाराजांनी समस्त भारतीयांना दिला आहे.'सबके लिए खुला है मंदिर यह हमारा' असं म्हणून 'आओ कोई भी पंथी, आओ कोई भी धर्मी, देशी-विदेशीयों को, खुला मंदिर यह हमारा' असा अतिशय पोटतिडकीने त्यांनी कृतिशील संदेश समाजास दिला.

आपल्या खंजिरी च्या नादातून सर्वसामान्याच्या मनात नवचैतन्य महाराजानी निर्माण केले.महाराजांनी भजने,गीतांमधून व्यक्त होणारा स्फूर्तिदायी आशय जनमानसाची घडण करण्यात मोलाची भूमिका बजावली.ज्या गावातील ते जात असत, तेथील आसपासच्या गावातील लोक गर्दी करत असत. खंजिरी सोबतच इतरही वाद्य महाराज कौशल्यपूर्वक रितीने हाताळत असत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी 'गुरुकुंज सेवाश्रम' ची स्थापना केली. त्यांनी समाजकार्यात आपले कार्य केले,लोकांना ते मार्गदर्शक ठरले त्यांचे कार्य अतुलनीय आहे.तरुणांचे आधारस्तंभ बनले,युवकांनी नीतिमान व सुसंस्कृत बनावे यासाठी त्यांनी अखंड उपदेश दिला. व्यसनाधीनतेचा त्यांनी तीव्र विरोध केला,युवकांनी व्यायाम करावा यासाठी ते सदैव अग्रही असत.

देशातले तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ. ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृतयुक्त कसे होतील, याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन तुकडोजींनी केले. व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध या राष्ट्रसंताने आपल्या लेखनातून केला.

स्वातंत्र्य संग्रामात संत तुकडोजी महाराजांनी सहभाग घेऊन खंजिरी भजने,कीर्तन,प्रवचनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. त्यांचा छोडो भारत चळवळीत सहभाग लक्षणीय होता. त्यांनी भजना द्वारे युवा पिढीमध्ये स्वतंत्र प्रेम जागविले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे आते है नाथ हमारेहे रचलेले गीत पूर्ती ठरले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे राष्ट्रपती भवन येथे झालेले खंजडी भजन ऐकून भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी त्यांना 'राष्ट्रसंत'ही उपाधी बहाल केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी राष्ट्र निर्माणाचे अतुलनीय कार्य केले. आपल्या भजनानी जनलोकांमध्ये चैतन्याचा,राष्ट्रप्रेमाचा झरा निर्माण केला. त्यांच्या दूरदृष्टी विचार समाजाला आज उपयोगी पडत आहेत. त्यांनी भारतीय समाज व्यवस्थेचा अभ्यास करून सर्वसामान्य जनतेला समर्थपणे जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले विचारांचा पुरस्कार केला. या महान राष्ट्रसंताच्या तत्त्वज्ञानात नवभारत निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे,त्यांच्या विचारातून,साहित्यातून, संस्कारातून सामाजिक सुधारण्याची परिवर्तनवादी तळमळ दिसून येते.

देशातील तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. ते बलोपासक असावेत, म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृतयुक्त कसे होतील, याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केले.त्यानी आपल्या लेखनातून व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध केला. आधुनिक व प्राचीन विचार, परंपरा यांचा सुंदर समन्वय त्यांच्या साहित्यात झाला आहे. त्यांनी मराठीप्रमाणेच हिंदी भाषेतही लेखन केले. आपल्या साहित्यात ग्रामोन्नती, महिलोन्नती, व्यसनमुक्ती, जीवनशिक्षण या सर्वांमधून स्वावलंबनाचा संदेश दिला. राष्ट्रपती भवनात झालेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चे खंजिरी भजन ऐकून राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी आपणास 'राष्ट्रसंत' म्हणून संबोधले. आपल्या भाषणांतून, कीर्तनांतून, अभंगगायनातून, लेखणी आणि वाणीतून तुकडोजी महाराज खर्या अर्थाने 'राष्ट्रसंत' असल्याचे जनतेने मान्य केले. प्रत्यक्ष सीमेवर जाऊन सैनिकांचे मनोबल उंचावणारा संत म्हणून संपूर्ण देशाने त्यांना वंदन केले. देशासोबतच विविध विदेशांमध्ये जाऊनसुद्धा महाराजांनी भारतीय धर्म व एकेश्वरवादाची मांडणी केली.तुकडोजी महाराजांनी केलेले कार्य आज प्रेरणा व स्फूर्ती देते. अशा या महान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज याच्या जयंतीनिमित्त माझे कोटी कोटी प्रणाम.

**- श्री.राहुल मोरे.**
**मो.न.९४०४१८११८१**

# झरी तालुक्यातील दाभाडी शीवपोड रस्त्याची दुरावस्था

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.२९, झरी (यवतमाळ) :** तालुक्यातील दाभाडी शीवपोड रस्त्याची दुरावस्था झाली असून तेथील रहदारीकर्त्यांना खड्डेमय रस्त्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

तालुक्यापासून सरळ जोडला जाणारा दाभाडी शीवपोड रस्त्यामध्ये जागोजागी खड्डे पडले असून त्या मार्गाने रहदारीकर्त्यांना त्रासाचा सामना करावा लागत आहे. याबाबत एका रहदारीकर्त्यांने त्या मार्गाच्या दयनीय अवस्था बाबत खड्डे पडले असल्याचा विडिओ वायरल करून लक्ष वेधले आहे. त्या रस्त्याच्या आजूबाजूचा भाग जंगल व्याप्त आहे. जंगली जनावरांची नेहमीच वर्दळ असते. अशा स्थितीत रस्ता सुरळीत चांगला असने गरजेचे आहे. कारण खड्डेमय रस्ता ओलांडताना दुचाकी चारचाकी पंक्चर होऊन वाहनात बिघाड येत असल्याने रहदारीकर्त्यांना जंगली जनावरांचा वावर असल्याने भीती वाटत आहे. खड्डेमय रस्त्यातील अडचणींमुळे रस्त्यातच रहदारी कर्त्यांचा वेळ वाया जात आहे. अशा स्थितीत हिंस्त्र जंगली जनावरांपासून मानवी जीवाला धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित रस्ते बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर मार्गाची दुरुस्ती करावी अशी मागणी त्या मार्गावरील रहदारीकर्त्यां कडून वाढली आहे.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांनी केले मतदानाचे आवाहन



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२९, नवी मुंबई :** संपूर्ण देशाभरात निवडणुकीची धामधूम चालू असताना अनेक ठिकाणी मतदान करण्याविषयी अनास्था दिसून येत आहे. अनेक ठिकाणी निवडणुकीवर बहिष्कार टाकला जात आहे. ईव्हीएम मशीन फोडल्या जात आहेत. राजकारण्यांचे बोलणे खालच्या पातळीवर आलेले आहे. अशा एक ना अनेक बातम्या सोशल मीडियावर सतत वाचण्यात आणि पाहण्यात येत आहेत. निवडणुकीतील मतदानाचे परसेंटेज खाली घसरत आहे.

अशा वेळेस नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने, वेगवेगळे उपाय वापरून मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा याकरिता मोहिमा राबविल्या जात आहेत. वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरल्या जात आहे. त्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसादही मिळत आहे. शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचाही सहभाग लाभत आहे.

नवी मुंबई हे स्वच्छतेत देशामध्ये अग्रमानांकित असणारे शहर असून येथील सेवाभावी वृत्तीने काम करणारे स्वच्छताकर्मी दैनंदिन स्वच्छता कार्याप्रमाणेच विविध लोकोपयोगी उपक्रमातही मनापासून सहभागी होत असतात. त्यांच्याद्वारे गणवेशावर लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याविषयी नागरिकांना आवाहन करणारे बिल्ले (बॅच) लावून त्या माध्यमातून मतदान करण्याविषयी संदेश दिला जात आहे.

महानगरपालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या गणवेशावर हे बिल्ले झळकत असून, त्यावर असलेल्या 'मी मतदान करणारच. तुम्हीदेखील आपला मतदानाचा हक्क बजावा. माझे मत माझा अधिकार' - अशा मजकुरातून अभिनव पद्धतीने मतदान करण्याविषयीचे आवाहन केले जात आहे. तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी मतदान करण्याविषयी जनजागृतीपर संदेशांचे प्रसारण करीत आहेत.

# संविधान बचाव - देश बचाव परिषदचे आयोजन

**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.२९, कळंब (धाराशिव) :** संविधान शाबूत ठेवण्यासाठी लोकशाही संस्थांची मोडतोड करून होत असलेला दुरूपयोग थांबविण्यासाठी भ्रष्टाचारास राजमान्यता देणारा भाजपाचा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडण्यासाठी प्रत्येक हाताला रोजगार देवून,महागाईला पायबंद घालण्यासाठी शेतकऱ्यांचे शेतीमालास कायदेशीर संरक्षण देण्यासाठी भूमिहीनांनी जगण्यासाठी सरकारी जमीनीवर (गायरान - जंगल जमिनीवर..) केलेली अतिक्रमणं नियमित करण्यासाठी.प्रत्येकाच्या हाताला काम - कामाचा न्यायपूर्ण दाम व सामाजिक सुरक्षा देण्यासाठी, दलित - आदिवासी - भटके, महिला व अल्पसंख्यांककांना सर्व प्रकारची सुरक्षा देण्यासाठी,जात - धर्माचे बखेडे थांबवून,समाजात सलोखा निर्माण करण्यासाठी,पुन्हा कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी धाराशिव-४० महाविकास आघाडी व शिवसेना ( उबाठा) चे उमेदवार खा.ओमराजे निंबाळकर यांना निवडून आणण्यासाठी भारत जोडो अभियान आयोजित संविधान बचाव - देश बचाव परिषदेचे आयोजन दि.२ मे २०२४ रोजी वार गुरूवारी दुपारी ३ वाजता तालुक्यातील हासेगाव (के) येथील पर्याय संस्थेच्या हॉलमध्ये भारत जोडो अभियानाचे मराठवाडा समन्वयक साथी सुभाष लोमटे,साथी विश्वनाथ तोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी संविधानवादी-लोकशाही-सलोखा व शांतता प्रेमींनी या परिषदेस आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन साथी भारत जोडो धाराशिव जिल्हा समन्वयक साथी सुभाष घोडके व साथी सुरेश शेळके यांनी केले आहे.

# मुदखेड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२९, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील भिमनगर, नविआबादी, अशोका नगर, रेल्वे कॉलोनी,लुंबिनी नगर, समता नगर, सिद्धार्थ नगर,येथे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी एप्रिल महिन्याच्या शेवटच्या रविवारी दि. २८ एप्रिल रोजी मुदखेड शहरातील विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त प्रथमता तथागत गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त शहरातील महात्मा फुले चौक या ठिकाणी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ऑटो पॉईट मित्रमंडळाच्या वतीने अन्नदान वाटपाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता यामध्ये प्रियतम चौदंते, विशाल कापसे, विनोद कांबळे, संजय सरोदे, सुभाष चौदंते, साजन आण्णा जोंधळे, कोंडुपंत चोंदंते, अरविंद कांबळे, प्रकाश चौदंते, संजय लोखंडे, रविंद्र कांबळे,शरिफ भाई, शंकर लेकडे, सुमेध भक्ते, यांच्यासह ऑटो पॉईट मित्रमंडळांनी परिश्रम घेतले.

# पोलिस भरती पुर्व प्रशिक्षणार्थींना टी-शर्ट वाटप

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.२९, जव्हार (पालघर) :** दिप प्रज्वलन झाल्या नंतर प्रसिध्द कवि रवि बुधर रचित रेवजी भाई यांचे स्तुती गीत चौक शाळेच्या मुलींनी सुमधूर स्वरांत सादर करून सर्वांची मने जिंकली. स्वां. सैनिक रेवजीभाई चौधरी यांची ११४ वी. जयंती मौजे माण ता. विक्रमगड येथे उत्साहात साजरी करणेत आली.

सदर प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आदिवासी कोकणा जमात प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आप. संदिप साठे साहेब यांची निवड करण्यात आली होती तर कार्यक्रमाच्या प्रसंगी स्वा. सैनिक रेवजीभाई चौधरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विष्णु चौधरी यांच्या मार्फत पोलिस, सैन्य व वनरक्षक भरती पूर्व प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थींना टी - शर्ट वाटप करणेत आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवि बुधर सर यांनी केले तर नारायण शेंडे साहेब यांनी स्वा. सै.रेवजिभाई चौधरी यांचा जीवनपटातील विविध प्रसंग आपल्या मनोगतात मांडले. तसेच आप. यदुनाथ भोये (कोकणा जमात सहसचिव) यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना स्व. सै. रेवजीभाई चौधरी यांनी राष्ट्रसेवा ते समाज सेवे पर्यंतचा जोपासलेला वारसा आपण सर्व समाज बांधव कोकणा जमात प्रतिष्ठानमार्फत निरंतर व अविरतपणे पुढे नेवुयात असे आश्वाशित केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष आप. संदिप साठे साहेब यांनी अध्यक्षीय भाषणात उपस्थित अकॅडमीतील प्रशिक्षणार्थींना येणाऱ्या भरतीत उतरुन यशस्वी होण्यासाठी मेहनत वाढवून आपल्यात क्षमता निर्माण केली पाहिजे असे मार्गदर्शन करून सदर अकॅडमीचे नामकरण आदिवासी कोकणा जमात संचलित स्वा. सै. रेवजीभाई चौधरी अकॅडमी या नावाची अधिकृत घोषणा करणेत आली.

तसेच सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी आदिवासी कोकणा जमात प्रतिष्ठानचे पदाधिकारी सदस्य राहुल धुम (उपाध्यक्ष), कमलाकर धुम, बिपीन जाधव, डॉ. सदाशिव पवार, गोविंद अवतार, सुनील बोरसे सर, दामोदर गवळी, सदाशिव राऊत, गोविंद गावित व स्वा. सै. रेवजिभाई चौधरी प्रतिष्ठानचे सदस्य ठाकरे, विनित चौधरी व चौधरी परिवार तसेच आदिवासी सेवा पुरस्कार सन्मानित लक्ष्मीबाई भोये, सरस्वती भोये मॅडम व माण गावचे ग्रामस्थ चंद्रकांत सवरा, गांगोडे दादा उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढविली.

# शाळांमधून मतदानाविषयी जनजागृतीपर उपक्रमांचे उत्साही आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२९, नवी मुंबई :** ठाणे सार्वत्रिक लोकसभा २०२४ ची निवडणूक २० मे रोजी होत असून या निवडणुकीच्या मतदार जागृतीसाठी आयोजित करण्यात येत असलेल्या विविध जनजागृतीपर उपक्रमांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. यासोबतच मुलांमार्फत पालकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यासाठी शालेय व महाविद्यालयीन स्तरावरही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये आई-बाबांस मतदान करण्याविषयीचे पत्रलेखन, मतदानाचा संदेश प्रसारित करणारी चित्रकला आणि रांगोळी रेखाटन, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंधलेखन, प्रभातफेरी, गायन, पथनाट्य असे नानाविध उपक्रम राबविण्यात आले. याशिवाय शाळांमध्ये पालकसभा आयोजित करून त्याठिकाणीही पालकांना मतदानाचे महत्व विशद करीत लोकसभा निवडणूकीत मतदानाचा अधिकार बजावण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमांच्या माध्यमातून शाळा आणि त्यालगतच्या परिसरातील नागरिकांचेही प्रबोधन करण्याचा प्रयत्न शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शाळाशाळांतील विद्यार्थ्यांनी केला. हे नानाविध उपक्रम महानगरपालिकेच्या शिक्षण अधिकारी अरूणा यादव यांच्या मार्गदर्शना खाली बेलापूर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील १७४ शाळा आणि ३९ कनिष्ठ महाविद्यालये याठिकाणी बेलापूर, शिरवणे, तुर्भे आणि वाशी या केंद्रांचे केंद्र समन्वयक रेखा पाटील, सागरनाथ भंडारी, जयमाला पाटील आणि प्रशांत म्हात्रे यांच्या नियंत्रणाखाली मोठ्या उत्साहात राबविण्यात आले.